**<u>वादीतर्फे उलटतपास – श्री. जी. टी. ठाकूर वकील.</u>**

**११.** माझे सातवी पर्यंतचे शिक्षण झाले आहे. मी माझ्या वकिलांना शपथपत्र करण्यासाठी माहिती दिली आहे. माझा दावा मिळकत गट क्र.११९ शी संबंध आहे, मला इतर दावा मिळकतीं बाबत माहिती नाही. गट क्र.११९ च्या पुर्वेला व उत्तरेला बाळासाहेब पाटील यांची जमीन आणि पश्चिमेला व दक्षिणेला भाईंगडे यांची जमीन आहे. मला सदर जमिनींचा गट क्र.११९ च्या खरेदीपत्रात उल्लेख केल्याबाबत सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला सदर मिळकतीच्या खरेदीपत्रातील मजकूराची माहिती नाही.

**१२.** मला खरेदीखत करताना मी वर सांगितलेल्या चतुःसिमा कथन केल्याचे आता आठवत नाही. मी गट क्र.११९ ची जोती भाऊ येसणे याच्याकडून दि.०७.०४.२००२ रोजी खरेदी केली आहे. जोतीच्या बायकोचे नाव शांताबाई आहे. मला राजाराम, भिमाबाई, पांडुरंग, तानाजी, धनाजी आणि शिवाजी ही त्यांची मुले असल्याबाबत माहिती नाही. मला खरेदीवेळी जोतीच्या वारसांबाबत माहिती घेण्यास कोणतीही अडचण नव्हती. मी सदर जमीन खरेदी करण्यापूर्वी वर्तमानपत्रात जाहिर नोटीस दिली नव्हती, मला सदर नोटीस देण्यास कोणतीही अडचण नव्हती.

**१३.** मी सदर मिळकत जोतीकडे कोठून आली याबाबत माहिती घेतली नव्हती, मला सदर माहिती घेण्यास अडचण नव्हती. मी सदर जमीन सन २००१ मध्ये खरेदी करेपर्यंत ती जोती त्यांच्या वडिलां सोबत कसत होता. मी सदर खरेदीला वादीची संमती घेतलेली नाही, मला त्याची संमती घेण्यास कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमीन विक्री करण्यासाठी जोतीला कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी जमीन खरेदी करण्यापूर्वी जोतीची कोणतीही अडचण दूर केली नाही. मी जोतीचे भूविकास बँकेचे आणि भावेश्वरी पतसंस्थेचे कर्ज भागवले होते. मी त्याबाबतच्या पावत्या शपथपत्रासोबत दाखल केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी जोतीची आर्थिक गरज भागवल्याचा कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही.

**१४.** मला सदर जमीन बेकायदेशीरपणे खरेदी केल्याबाबत वादीने गावातील तंटामुक्ती समितीकडे तक्रार दिल्याची माहिती नाही. माझ्या गावात माझ्या नावाची मी एकमेव व्यक्ती आहे.

हे म्हणणे खरे नाही की, दि.२३.०३.२०१५ रोजीच्या बैठकीला मी व वादी गावतंटामुक्ती समिती समोर हजर झालो होतो. मला वादीने सदर मिळकत खरेदी घेण्यासाठी वकिलांमार्फत नोटीस पाठवल्याची माहिती नाही. मला सदर नोटीस मिळून देखील तिचे उत्तर दिल्याची माहिती नाही. मी गावचे माजी सरपंच कृष्णा येसणे यांना ओळखते. मी गावातील महादेव सुतार व मारुती दाजी इंगळे यांना ओळखत नाही.

**१५**. मला कृष्णा येसणे, महादेव सुतार, मारुती दाजी इंगळे आणि तंटामुक्ती समिती सोबत माझी व वादीची मी खरेदी केलेल्या मिळकतीबाबत बैठक झाल्याची माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या बैठकीत मी वादीला संपुर्ण मिळकत विकण्यास नकार देऊन त्याच्या हिस्याची मिळकत विकण्याची तयारी दाखवली होती. हे म्हणणे खरे नाही की, वादीने त्यावेळी संपुर्ण जमीन खरेदी देण्याची मागणी केली होती.

**१६**. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीच्या वडिलांना खरेदीची कोणतीही रक्कम रोखीने दिलेली नाही. मला वादीच्या वडिलांना किती रक्कम रोखीने दिली ते आता आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणतीही रक्कम रोखीने दिलेली नसल्यामुळे मला त्याबाबत आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती गावकारभारात सहभाग घेतात. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे गावपातळीवरती तसेच सोसायटी व पतसंस्थेमध्ये माझ्या पतीच्या सांगण्याप्रमाणे पावत्या केल्या जातात.

**१७**. मला वादी मागत असलेल्या प्रथम अधिकाराची माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीला सदर अधिकार नसल्याचे मी चुकीचे व खोटे नमूद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीचा गट क्र.११९ मधील हिस्सा डावलण्यासाठी मी सदर जमिनीची खरेदी केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.११९ ची मिळकत वादीला मिळू नये यासाठी मी खोटा जबाब दाखल करुन आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण. फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.

दिनांक – १६.०६.२०२५.